महाराष्ट्र शासन,

# उद्योग विभाग

## जिल्हा उद्‍योग केंद्र, सोलापूर

## जिल्हास्तरीय कार्यालयांसाठी १०० दिवसांच्या कृती आराखड्याबाबत...

दिनांक :- ०१/०४/२०२५

# १. संकेतस्थळावर अद्यावतीकरण करणे (Website Updation)

उद्योग संचालनालयाचे **www.di.maharashtra.gov.in** हे एकच संकेतस्थळ असुन सदर संकेतस्थाळावर सर्व माहिती अद्यावत केलेली आहे.

तसेच उद्योजकांना व प्रस्तावीत गुंतवणुकदारांना विभागाच्या सर्व योजनांची माहिती मिळण्याकरीता तसेच विविध विभागाचे परवाणे मिळण्याकरीता Single-window system for investor facilitation MAITRI 2.0 Portal https://maitri.maharashtra.gov.in दिनांक 04 फेब्रुवारी 2025 रोजी कार्यान्वीत करण्यात आले आहे

Government of Maharashtra

**26 February 2025**

**Subject: Launch of MAITRI 2.0 – Ushering a New Era of Industrial Excellence in Maharashtra**

Dear Officer,

We are thrilled to announce that MAITRI 2.0 portal, Maharashtra's most advanced **single-window system for investor facilitation**, was launched by the **Hon'ble Chief Minister on 4 February 2025**. This groundbreaking initiative redefines **ease of doing business**, bringing transparency and efficiency to governance.

**What's New in MAITRI 2.0?**

A **next-generation, AI-powered** online portal dedicated to investor facilitation system, designed to make business operations seamless:

1. **Comprehensive G2B Services** – Access to all industry-related permissions, licenses, and approvals in one place, making business setup and operations faster.
2. **Online Wizard** – Hassle-free guidance for approvals and compliance.
3. **Incentive Calculator** – Enter your company and project details to instantly get eligible incentives, removing the tedious task of reviewing policy documents.
4. **Real-Time Dashboard** – Monitor applications, approvals, and compliance status live.
5. **AI Chatbot -** Get instant responses to queries on policies, incentives, and approvals anytime.
6. **Integrated Call Centre -** Expert support on call to assist investors with queries and concerns.
7. **User Feedback System** – A dedicated platform to share feedback and improve investor services.
8. **Centralized Document Repository** – Securely store documents once and reuse them for multiple applications.
9. **Compliance Dashboard** – Track, manage, and stay updated on all regulatory requirements in one place, ensuring timely compliance.
10. **Grievance Redressal System** – Submit and track grievances with a best-in-class resolution rate of 98.28%, ensuring quick and efficient issue resolution.
11. **Seamless NSWS Integration** – Submitted data is automatically updated on the National Single Window System, ensuring synchronized and efficient approvals.

We invite you to experience **MAITRI 2.0** 's benefits firsthand to accelerate business growth. You are also requested to **create awareness in your district** to ensure maximum utilization of MAITRI 2.0 by industry stakeholders. We will provide all necessary support, including materials and demonstrations.

Let's work together to drive Maharashtra's industrial growth!

*MAITRI Single Window*

**Shri Deependra Singh Kushwah (IAS)**
Development Commissioner (Ind.) | Chairman (MAITRI)

e-Mail: didci@maharashtra.gov.in | maitri-mh@mah.gov.in

Phone: +91-22-22622322 | 22622361 | 22622362

*Click on the icons to follow MAITRI on social media for latest updates*

## २. सुकर जीवनमान (Ease of Living)

या कार्यालयाकडून नागरिकांसाठी खालील दोन सेवा विहीत वेळेत व जलदगतीने देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.सदर योजनांकरीता सेवाकालावधी हा ७ दिवस एवढा निश्चित केला आहे.

- ❑ मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रम (CMEGP).
- ❑ पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रम (PMEGP).

.

# ३ – कार्यालयीन स्वच्छता (Cleanliness)

कार्यालय व परिसरातील स्वच्छता नियमितपणे केली जाते. त्याबाबतची काही छायाचित्र.





## ४. जनतेच्या तक्रारीचे निराकरण (Grievance Redressal)

१. आपले सरकार पोर्टलवर या कार्यालयाशी संबधीत प्रलबिंत तक्रारी निरंक आहेत.
२. माहितीचा अधिकार अंतर्गत या कार्यालयाकडे ४ अर्ज प्राप्त झाले होते ते सर्व निकाली काढण्यात आले आहेत.
३. अभ्यागंताच्या भेटीसाठीचा फलक दर्शनी भागात लावण्यात आला आहे,त्यांच्या भेटी घेवुन समस्यांचे निराकरण करण्यात येत आहे.


## ५. कार्यालयीन व्यवस्था (सोयी सुविधा) (Amenities)

१. कर्मचारी व अभ्यागंतासाठी कार्यालयात कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रसाधन गृहे (महीला व पुरुष) तसेच प्रतिक्षालय सुस्थितीत आहे.





# 2. कार्यालयात  विविध योजनांसंबधी माहिती देणारे फलक दर्शनी भागात लावण्यात आले आहेत.






# ६. शासनाचे विविध प्रकल्प योजना पूर्णत्वास नेणेसाठी उपाययोजना (Investment Promotion)

१.उद्योग क्षेत्रातील गुंतवणुक वाढविण्यासाठी प्रस्तावीत गुंतवणुकदारांचे सर्व परवाणे विहीत कालावधीत निर्गमित होणेसाठी व अन्य समस्यांचे निराकरण करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व संबधीत विभागाचे विभागप्रमुख यांच्या उपस्थीतीत नियमीत बैठका आयोजीत करण्यात येत आहेत.

२. या कार्यालयाकडील क्षेत्रीय स्तरावर काम करणारे सर्व उद्योग निरीक्षक व व्यवस्स्थापक यांचा आढावा प्रत्येक सोमवारी घेण्या त येतो व गती वाढविण्यासाठी दिशा निर्देश दिले जातात.

# गुंतवणुकदार उद्योजकांच्या अडचणीचे निराकरण करणे बाबत बैठक दिनांक १८/०२/२०२५





**जिल्हा उद्योग केंद्र सोलापुर**
**१०० दिवस कार्यक्रम अंतर्गत उद्योजकांच्या अडचणी संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक दिनांक १८.०२.२०२५ चे ईतिवृत**

उद्योग क्षेत्रातील प्रस्तावीत गुंतवणुकदारांच्या अडी अडचणी वर चर्चा करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी सोलापुर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८/०२/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, सात रस्ता सोलापुर येथे बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीस संबधित विभागाचे अधिकारी व उद्योजक उपस्थीत होते. महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र सोलापुर यांनी सर्व उपस्थीतांचे स्वागत करुन शासनाने १०० दिवसांचा विशेष कार्यक्रम हाती घेतला असुन सदर कालावधीत उद्योजकांच्या अडी अडचणींचा जलद गतीने निपटारा होणे व नविन गुंतवणुक होणेसाठी **उद्योगस्नेही** उपक्रम हाती घेण्यात आला असल्याचे सांगुन उद्योजकांनी त्यांच्या अडचणी मांडणेबाबत विनंती केली. त्यानुसार बैठकीमध्ये उद्योजकांनी खालील प्रमाणे अडचणी मांडल्या.

१. मे.दर्शना स्वाल्वंट प्रा.लि. बार्शी यांनी त्यांचा सोयाबीनवर प्रक्रीया करणार उद्योग घअक असुन त्याकरीता अखंडीत विद्युत पुरवठा आवश्यक आहे. त्याकरीता महावितरणकडुन Transformer ही मंजुर आहे परंतु त्याकरीता जागा उपलब्ध नाही.
२. मे. भुसेवा फार्मर्स प्रोडयुसर कं. अनगर या घटकांने गावठान फीडरवरुन विद्युत पुरवठा होत असल्याने विद्युत पुरवठा सतत खंडीत होत आहे. तसेच उद्योग घटकाला औद्योगीक प्रयोजनार्थ बिनशेती वापर सुरु करावयाचा असल्यास अकृषी वापराची सनद आवश्यक नसल्याचे दिनांक २९/०१/२०२५ रोजी निर्गमित शासन निर्णयामध्ये नमुद आहे त्याबाबत स्पष्टता व्हावी.
३. मे. कोठारी ॲग्रोटेक प्रा. लि. या घटकांने कामगारांच्या सुरक्षेतेसाठी रोड डीव्हायडर असणे आवश्यक असल्याचे सांगितले तसेच कांमगार व त्याच्यावर अवलंबितांची संक्ष्या जवळपास २००० चया असपास असुन त्याकरीता Dispensery चालु करणे आवश्यक असल्याचे सांगितले.
४. मे. गडडम अँड ग्रुपचे श्री. पेंटप्पा गड्डम यांनी टेक्सटाईल डाईंग करीता मोठया प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते परंतु पाच दिवसाल एकवेळा पाणी येत असल्यामुळे अडचणी येत असल्याचे नमुद केले. तसेच अक्कलकोट रोड MIDC मधील अंतर्गत रस्तयांची दुरुस्ती अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले
५. मे. लोकनेते इंडस्ट्रीजचे श्री. थिटे यांनी चंद्रमौळी सह औ. वसाहतीमधील रस्ते नादुरुस्त असुन वाहतुकीस अडचणी होत असल्याचे नमुद केले.
६. मे. गुलमिरे सॅनिटेरी वेअर या घटकांने सुरळीत विद्युत पुरवठाकरीता स्वतंत्र फीडर आवश्यक असल्याचे सांगितले.

वरील अडचणी व उद्योजकांशी ईतर अनुषंगिग बाबीसंदर्भात चर्चा केल्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांनी असे नमुद केले की बहुतांश अडचणी या पायाभुत सुविंधा किंवा संबधीत विभागाकडुन उद्योजकांना आवश्यक असणारे परवाने याबाबत आहेत. सदर समस्या

सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर कायमस्वरुपी व्यासपीठ तयार होणेसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबधीत विभागाच्या जिल्हाप्रमुखांची एक समिती गठीत करावी. त्यानुषंगाने खालील प्रमाणे समिती गठीत करण्याचे निश्चित झाले.

| **अ.क्रं.** | **विभागप्रमुखाचे नांव** | **पद** |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | उप जिल्हाधिकारी (महसुल) | सदस्य |
| ३. | अधिक्षकीय अभियंता (महावितरण) | सदस्य |
| ४. | पोलीस उप अधिक्षक, सोलापुर | सदस्य |
| ५. | विभागीय अधिकारी (MIDC) | सदस्य |
| ६. | उप प्रादेशिक अधिकारी (MPCB) | सदस्य |
| ७. | उप संचालक, औद्योगीक सुरक्षा व आरोग्य, सोलापुर | सदस्य |
| ८. | सहायक आयुक्त (कामगार), सोलापुर | सदस्य |
| ९. | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडीया (अग्रणी बँक), सोलापुर | सदस्य |
| १०. | सहायक संचालक, सोलापुर नगर रचना कार्यालय, सोलापुर | सदस्य |
| ११. | उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, सोलापुर | सदस्य |
| १२. | जिल्हा सह निबंधक तथा मुद्रांक जिल्हा अधिकारी, सोलापूर | सदस्य |
| १३. | महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापुर | सदस्य सचिव |

तसेच ज्या समस्या तालुकास्तरावर सोडविण्यासारख्या आहेत त्याकरीता संबधीत प्रांत अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबधीत विभागाचे तालुका प्रमुख यांची समिती गठीत करावी. उपरोक्त दोन्ही समित्यांची बैठक ठरावीक कालावधीनुसार आयोजीत करुन उद्योजकांच्या अडचणींचा जलद गतींने निपटारा करावा असे निर्देश मा. जिल्हाधिकारी यांनी दिले.

महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांनी लवकरच मैत्री पोट्रल २.० कार्यान्वीत होत असुन सर्व घटकांनी कोणताही अर्ज करायचा असेल तर मैत्री पोर्टलच्या माध्यमातुनच करावा. सदर पोर्टलवर केलेल्या अर्जावर विहीत कालावधीत कार्यवाही होणेबाबतचे सनियंत्रन वरीष्ट स्तरावरुन करण्यात येणार आहे. त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी सदर पोर्टलवर जिल्हयाकरीता Dash Board देणेबाबत आपल्या संबधीत विभागास कळवावे असे सुचित करुन तोपर्यंत सर्व उद्योजकांचा एक whatsapp ग्रुप तयार करावा व सदर ग्रुपवर अडचणींची नोंद करण्यासाठी Google sheet उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश दिले. त्यावर महाव्यवस्थापक यांनी लवकरच तशी सुविधा उपलब्ध करुन सर्व उद्योजकांना कळविण्याचे मान्य केले.

त्यानंतर सर्वांचे अभार व्यक्त करुन बैठक संपल्याचे जाहीत करण्यात आले.

महाव्यवस्थापक
जिल्हा उदयोग केंद्र सोलापूर

जिल्हाधिकारी
सोलापुर

सिटी अँकर | सर्व परवाने 'एक खिडकी'तून मिळतील, जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून सेवा

# पाच कोटींपेक्षा अधिक गुंतवणुकीच्या उद्योगांसाठी उद्योगस्नेही उपक्रम, ६० उद्योग सुरू होऊ शकतात

प्रतिनिधी | सोलापूर

उद्योगवाढीला चालना देण्यासाठी आणि पाच कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी 'उद्योगस्नेही' उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्यातून येत्या तीन वर्षांपर्यंत जवळपास ६० नवीन उद्योग सोलापुरात सुरू होण्याची अपेक्षा असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. उद्योग उभारणीत समस्या आहेत किंवा उभारणी थांबली अशा उद्योजकांचे प्रश्न समजावून घेऊन स्थानिक पातळीवरील अडचणी त्या त्या विभागाकडून सोडवण्यासाठी उद्योगस्नेही उपक्रम आहे.

त्यासाठी दोन समित्या गठित केल्या. जिल्हा समिती माझ्या अध्यक्षतेखालीच आहे तर दुसरी तालुका पातळीवर समित्यांचे अध्यक्ष तहसीलदार असतील.

## तीन वर्षांपर्यंत नवीन उद्योग येतील



जिल्ह्यात जवळपास ६० नवीन उद्योग येत्या तीन वर्षांत सर्व प्रक्रिया पूर्ण करून सुरु होतील. त्यांना परवाने मिळवणे, वीजजोडणी, जागेसंदर्भातील अडचणी, 'ना-हरकत' प्रमाणपत्रे, विविध विभागांच्या परवानग्या याबाबत कुठे काम अडले असेल तर त्या त्या यंत्रणांना सांगून मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे.

**कुमार आशीर्वाद**, जिल्हाधिकारी

## आता अडचणी, समस्या सुटणार



राज्य शासनाने 'मैत्री २.०' हे नवीन पोर्टल सुरू केले आहे. त्याद्वारे उद्योगांना आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या परवानग्या, त्यांना हवी असलेली मदत यासाठी सहाय्य करेल. 'एक खिडकी'चाच हा एक भाग आहे. राज्यस्तरावर हे पोर्टल असले तरी जिल्हा पातळीवर त्याचे अॅक्सेस आहेत.

**संतोष कोलते**, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र

# गुंतवणुकदार उद्योजकांना पोषक वातावरण तयार होणेसाठी गुंतवणुक परिषद व सामंजस्य करार

१. गुंतवणुकदार व व्यवसायीकांना एकत्र व्यासपीठ तयार करुन देण्याकरीता जिल्हा गुंतवणुक परिषद -२०२५ चे आयोजन दिनांक ११/०४/२०२५ रोजी हॉटेल सेंटर पॉईंट येथे आयोजीत करुन ११३ उद्योकासोबत रु. ३१०२.६४ कोटी गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत.



# उद्योजकांसोबत सामंजस्य करार -२०२५



दैनिक दिव्य मराठी

2025-04-12
सोलापूर सिटी (3)

अर्थ चालना • ११३ कंपन्यांसोबत करार, ३१०२ कोटींची गुंतवणूक होणार

# फार्मात ७५०, कृषी-अन्न प्रक्रियेत ५००, तर टेक्स्टाइलमध्ये २०० कोटी गुंतवणूक

प्रतिनिधी | सोलापूर

जिल्ह्यात पुढील ३ वर्षांत ३१०२ कोटींची गुंतवणूक करण्याची तयारी ११३ उद्योजकांनी ठेवली आहे. त्यांनी उद्योग विभागासोबत तसा करारही केला. त्यात ६ फार्मा कंपन्यांनी सर्वाधिक ७५० कोटींची गुंतवणूक आहे. त्या खालोखाल २३ कृषी व अन्न प्रक्रिया कंपन्या ५०० कोटी गुंतवणार आहेत. तर ७ टेक्स्टाइल कंपन्यांनी जिल्ह्यात २०० कोटींची गुंतवणूक करण्याचा करार केला आहे.

पुढील ३ वर्षांत हे उद्योग उभारून त्या माध्यमातून ७३५८ रोजगार निर्मिती होणार आहे. त्यातून युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्नही सुटू शकणार असल्याचे सांगण्यात आले. हॉटेल सेंटर पॉइंट येथे शुक्रवारी गुंतवणूक परिषद झाली. करारावर उद्योग विभागाचे सहसंचालक शैलेश राजपूत यांनी सह्या केल्या.

मुंबई आणि पुण्यात वाहतूक समस्येने त्रस्त झालेले उद्योजक आता सोलापूर जिल्ह्याकडे आकर्षित होत आहे. त्यांच्यासाठी शासनाकडून अक्षरक्ष: पायघड्या टाकल्या जात आहे. सोलापूर जिल्ह्यातील सातही एमआयडीसींमध्ये उद्योग उभारण्याची तयारी उद्योजकांनी दाखवली आहे. बँकांनीदेखील जलदगतीने उद्योगांसाठी कर्जपुरवठा करण्याची तयारी या परिषदेत दर्शवली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उद्योग विभागाचे महाव्यवस्थापक संतोष कोलते, व्यवस्थापक अनिल साळुंखे, व्यवस्थापक सी. एच. गुळमे यांच्यासह सर्व शासकीय विभागाचे प्रमुख अधिकारी व उद्योजक उपस्थित होते.

## सिंगल विंडोतून परवाने, बँकांचीही जलदगतीने कर्जे देण्याची तयारी




उद्योग विभागाच्या वतीने सेंटर पॉइंट हॉटेलमध्ये शुक्रवारी झालेल्या गुंतवणूक परिषदेत बोलताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद. मंचावर मान्यवर मंडळी.

### 'उद्योजकांसाठी कलेक्टर कचेरीचे दरवाजे उघडे'

1 उद्योजकांना आवश्यक ते परवाने, ना-हरकत प्रमाणपत्रे देण्यासाठी प्रशासनाने सतर्क रहावे, कोणाचीही अडवणूक न होता त्यांचा रस्ता मोकळा करून तत्काळ मदत पुरवण्यात यावी. कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक करावी, याचे सल्ले उद्योजकांना देऊ नये, कारण, त्यात त्यांचा अभ्यास असतो.

2 प्रशासनाने केवळ त्यांना आवश्यक ती मदत तत्काळ पुरवावी. असे आदेश प्रशासनाला देताना उद्योजकांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाची दरवाजे सतत उघडी राहतील, अशी ग्वाही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.




दिव्य मराठीने १० एप्रिलला दिले होते वृत्त.

### उद्योजकांसाठी मैत्री कक्ष सुरू

उद्योगांसाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या सिंगल विंडोच्या माध्यमातून देण्यासाठी शासनाकडून मैत्री कक्ष सुरू करण्यात आले आहे. सर्व प्रकारचे शासकीय परवाने सुलभपणे देण्यासाठी मैत्री कक्षाची मदत होत आहे. या कक्षात शासनाच्या प्रत्येक विभागाच्या एका कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. एआयशी निगडीत चार्टबोर्डही या कक्षाद्वारे तयार करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली.

### ग्लेनमार्क, एम्प्रा, सुरेश्वरमसह इतर कंपन्यांची गुंतवणूक मोठी

ग्लेनमार्क लाइफ सायन्सेस लिमिटेड ५५० कोटी, एम्प्रा डिस्टिलरीज प्रायव्हेट लिमिटेड १५० कोटी, सुरेश्वरम बायोफ्युएल प्रायव्हेट लिमिटेड ११० कोटी, रेलिकॉन फार्मासिटीकल्स प्रायव्हेट लिमिटेड १०० कोटी, जीआरपी लिमिटेड १२० कोटी, एव्हिएशन मोटार्स प्रायव्हेट लिमिटेड १०० कोटी रुपये गुंतवणूक करणार आहे.

सत्य सांगू, बिनधास्त
दिव्य मराठी

# ७. क्षेत्रीय भेटी (Field Visits)

१. तालुका स्तरावर आयोजीत सर्व बँक शाखा व्यवस्थापकांच्या बैठकीस उपस्थीत राहुन CMEGP अंतर्गत कर्ज वाटपाचाआढावा घेण्यात आला आहे.

२. CMEGP अंतर्गत सहभाग वाढविण्यासाठी विविध मेळावे घेण्यात आले आहेत.

Thank You

धन्यवाद